### कृषीवलाची खरी अुन्नति

हें सर्व जरी खरें असलें तरी हिंदी कृषीवलाची खरी अुन्नति दर अेकरीं अुत्पादनाची ५० टक्के वाढ झाल्याखेरीज होणें जवळ जवळ अशक्यच समजावें. आणि अशी वाढ आधुनिक शेतीशास्त्राच्या मदतीनें होणें मात्र अगदी शक्य आहे. अशी शास्त्रीय सुधारणा करण्याची जबाबदारी अर्थातच स्वतंत्र सरकारावर आणि दूरदर्शी धनिक संस्थानिकांवर, तसेंच जमीनदारांवर असणार. हिंदी शेतीबद्दल अनेक अधिकाऱ्यांनी निराशावादी अहवाल लिहिले असले तरी खुल्या दिलानें विचार करणाऱ्यास अशा वादास वाव देण्यास अुत्तम कारणें आहेत. ज्यांनी हिंदी शेतीचें काळजीपूर्वक निरीक्षण केलें आहे व ज्यांना शेतीचा अनुभव आहे त्यांच्या मतें अुत्पन्नाची वाढ करणें शक्य आहे, पण त्या अुत्पादनाचा विनियोग मात्र स्वदेशांतच व्हावा असा त्यांचा सल्ला. परदेशी व्यापाराकडे बरेंच लक्ष दिलें जातें त्याअैवजी राष्ट्रांतील अुद्योगधंदे वाढविण्याकडे लक्ष दिल्यास व धंद्यांची शेतीशीं सांगड घातल्यास अमेरिकेप्रमाणे हिंदी राष्ट्राला सुद्धा स्वावलंबी होअून समर्थ होतां येअील. लहान लहान युरोपिअन राष्ट्रांची गोष्ट निराळी. त्यांना अिंग्लंडप्रमाणे परदेशी व्यापाराकडे धूर्त डोळा ठेवणेंच भाग. अमेरिकन व्यापाराची सर्वत्र टिमकी वाजते खरी; पण वस्तुतः फक्त ५ टक्के व्यापार परदेशाशीं करून हा देश ९५ टक्के व्यापार आपल्या देशांतच करतो. त्यामुळे लोकांच्या राहणींत अुन्नति होत जाअून अितर राष्ट्रांस फुकट अनंत कोटि डॉलर्सचा माल पुरविणें सुद्धा अमेरिकेला साधलें आहे. युद्धापूर्वीच्या काळांत दरमाणशीं शेतीवर अमेरिका १२·३७ रुपये खर्चीत असे तर हिंदुस्थानांत प्रान्तवारीनें, पंजाबांत ·१७०, मुंबअीत ·०५१, मद्रासमध्ये ·०४५ व बंगालमध्ये ·०३५ दरमाणशीं शेतीवर खर्च केला जात असे. रशियांत तर शेतीवर दरमाणशीं १२·४५ रुपये खर्च होत असे. कारण नवीन रशियन सरकारला त्या देशाची वाढ करण्याची कळकळ लागली होती.

---

# शिवराज्याभिषेकाचा पोवाडा

कविभूषण महाराष्ट्रशाहीर प्रल्हादराय जामखेडकर, जळगांव ( पू. खा. )

शके पंधराशे शाहाण्णव सालीं, सुवेळा आली, हिंदभू भालीं, तिलक शोभतो
शिवराय खास, पटाईत योद्धा महाराष्ट्रांत, प्रल्हादराय नित्यदंग कवनांत ॥ ध्रु० ॥

चौक १ ला

शिवराज राजकारणी, महा धोरणी, अुडी घे रणीं, करूनिया शत्रूंचा संहार, स्थापिलें राज्य महाराष्ट्रांत, हिंदूंचा वाली जन्मला ख्यात ॥ आकस्मात आली कल्पना सुचेना मना, अेक भावना, शत्रूवरी पूर्ण कराया मात, राज्याभिषेक व्हावा आपणांस, मान सन्मान सर्व जगतांत ॥ भले भले विद्वान आले, रण माजलें, शेतकरी भले, यांना कोठला राज्याधिकार, पुंड पाळेगार सारे ठरणार, क्षत्रिया खरा खरा अधिकार ॥ गागाभट्ट काशी क्षेत्रीचे विद्वान पट्टीचे, नाही लेचेपेचे, षड्शास्त्रें तीं त्यांचे मुखांत, वेदशास्त्रांचा मोठा हव्यास, न्यायनीतींत पूर्ण निष्णात ॥ चाल :— गागाभट्ट आले पाहून त्यांचा तो केला सन्मान ॥ शास्त्राधार सर्व पाहून, शास्त्रीजी बोले झटकन ॥ मराठ्यांस नाही अधिकार, छत्र हें शिरीं धरण्यास ॥ शास्त्रीजी देती वचन, मूळ मी तुमचे शोधीन ॥ चाल :— आटोकाट यत्न तो केला त्यानें त्या वेळा ॥ शिसोदे कूळ-

भुषण सूर्यवंशाला ॥ जन्मला शीवभूपाल याच वंशाला ॥ राज्याभिषेक करण्याचा बेत त्यांनी ठरविला ॥ ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शनिवार दिवस नेमिला ॥ काय वर्णू भाग्य राया चें धन्य सुवेळा ॥ हरकली जिजाअी मोद मनीं मावेना ॥ पुत्र हा गुंडा नाचतो त्याच्या किर्तीचा झेंडा ॥ गो-ब्राह्मण-पालक वंद्य देवदेवता ॥ चाल :– शिवाजीने तीं वस्त्रें चढविलीं स्वच्छ पांढरीं त्या वेळा, पुष्पमालाहि शुभ्र गळ्यामधे शुभ्र – अलंकार ते नाना ॥ सोन्याचा चौरंग करविला, कलशहि केला सोन्याचा, त्यावरी राजाराणी बसले मागे संभाजी तो साचा ॥ अभिषेक होता, सर्जा चालला त्याच वेळेला सदरेला सदर सजविली नाना प्रकारें तेंच सांगतो तुम्हांला ॥ चाल :– भिंतीवरी चित्रें काढलीं हातीं आटोकाट, वृक्षछाया घनदाट, काय वर्णावा थाट, भरजरी छत शोभला, शोभला हो मोत्याच्या झालरी लोंबल्या ॥ डवणा पाचू मर्वा कुंड्या होत्या लअीदाट, काश्मीरी गुलाब दाट, सुवास येतो घमघमाट, पानविडे जागजागेला, जागेला हो गालिचे सर्व जमिनीला ॥ सुवर्णाचें तक्त केलें त्याने मजेदार, बत्तीस मण त्याचा भार, रत्नें जडलीं अनिवार, माणिक मोतीं पाचू चमकती, चमकती हो आकाशीं तारे जणूं अती ॥ रत्नजडीत सिंव्हासन त्याला खांब आठ, छत्रचामर अफाट, धार्मिक सारा थाट, व्याघ्राचेंर त्यांत बसण्याला, बसतांना हो आर्यांचा आचार आचरिला ॥ मृत्यु-लोकीं आला काय अिंद्रदरबार, आष्ठ प्रधान बाणेदार रणमस्त सरदार, अिंद्रास शोभे देवगुरु देवगुरु हो तसा शिवाजीस भट गुरु ॥

सिंव्हासनीं बसविला शीव भूपाल, पुष्पवृष्टीची धमाल, केली साऱ्यांनी कमाल, पंचार्ती आली आर्तीला, आर्तीला हो वेद घोष त्याचे जोडीला ॥ वाद्यांचा गजर झाला सारा दणदणाट, तोफा सुटती आफाट, भयंकर गडगडाट, क्षणो क्षणीं आवाज दणक्यांत, दणक्यानं हो किल्यावरन तोफा सुटतात ॥ भरजरी राजमुगुट घेअून हातांत, मध्यभागीं तो मध्यांत, मोत्याचा तुरा त्यांत, गागाभट्ट चाले डौलानं, डौलानं हो शिवाजीचें मस्तकीं ठेवीत ॥ छत्रपति गर्जति लोक वारंवार ( श्रीछत्रपति शिवाजी महाराज की जय ) केला त्यांनी जयजयकार, वंदितो दरबार, दुमदुमे अवधी मेदिनी हो तशी धन्य शिवजननी ॥ नाना वस्त्रें अलंकार दिले त्याने दान, ज्याचा त्याचा ठेवून मान, केला योग्य तो सन्मान, लाखो होन दिले विप्रांना, विप्रांना हो तसे दिले गोरगरिबांना ॥ पन्नास हजार विप्र आला होता आटोकाट, पन्नास हजार अितर जात, भिक्षेकरी वेगळा त्यांत, लाखावर लोक पंगतीला, पंगतीला हो होते दोन्ही वेळ जेवण्याला ॥ हत्तीवर अंबारी राजा झाला स्वार, मागेपुढे घोडेस्वार, ललकारी चोपदार, जरी पटका होता आघाडिला, आघाडीला हो तसा भगवा झेंडा जोडीला ॥ स्वारी चाले रस्त्यानं मंगलप्रभात, नारी होत्या त्या दारांत, ओवाळीती आनंदांत, आनंद मावेना हृदयांत, हृदयांत हो आनंद सर्व जनतेंत ॥ ( मिळवणी ) चाल :– शिवसिंव्ह झाला भूपाल, राज्य स्थापिल, बंड मोडील, यवनावर केली पूर्णपणे मात, गो-ब्राह्मण-पालक ख्यात, प्रल्हादराय नित्य दंग कवनांत ॥